# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. १५४-२३ दिनांक :- १४/०५/२०२३

## ज्वेलर्स दुकानाचे शटर उचकटुन चोरी करणारे तसेच कार व ट्रक चोरी करणा-या सराईत आरोपीतांना अटक करुन १२ गुन्हयाची उकल गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांची कामगिरी.

-------ooooo-------

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासुन घरफोडी व चारचाकी वाहने चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हयांस पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक ११/०९/२०२२ रोजी रात्रौ २१.३० वा. ते दिनांक १२/०९/२०२२ रोजी रात्रौ ०२.५६ वा.चे दरम्यान कावेरी ज्वेलर्स, शॉप नं.- १३, पॅराडाईज को-ऑप.हौ.सोसा.एस.टी.डेपो रोड, नालासोपारा पश्चिम ता. वसई, जि. पालघर या बंद ज्वेलर्स दुकानाचे लोखंडी ग्रीलचे कुलुप तसेच बंद लोखंडी शटरचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने तोडून सेंटर लॉक तोडण्याचा प्रयत्न करुन सेंटर लॉक न तुटल्याने ज्वेलर्स दुकानाचे बाहेरील सी.सी.टी.व्ही. कॅमेरा चोरी करुन ज्वेलर्स दुकानात घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी नामे गोविंदसिंग कैलाससिंग पुरोहीत नालासोपारा प., ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारी वरुन नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ३७८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८०, ३७९, ४२७, ५११ अन्वये गुन्हा करण्यात आला होता.

सदर घटनेच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ कडे सुपुर्द करण्यात आला होता. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष, ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे दिपकसिंग उर्फ भुशीसिंग राजुसिंग टाक, वय- ३९ वर्षे, रा. कामतघर, भिवंडी, जि. ठाणे यास ताब्यात घेवुन तपास केला असता सदर आरोपीत यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक ०८/०५/२०२३ रोजी १६.२३ वाजता अटक करण्यात आले. अटक आरोपीत याचेकडे अधिक तपास करता त्याने चोरी केलेल्या २ इको कार व १ शेवरलेट एंन्जॉय कार असा १०,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन घरफोडी चोरी व चारचाकी वाहन चोरीचे १० गुन्हे उघडकीस आले आहेत.

## -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | नालासोपारा पोलीस ठाणे | ३७६/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ४५७,३८०,३७९,४२७,५११ प्रमाणे |
| २ | विरार पोलीस ठाणे | ७९९/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ३ | विरार पोलीस ठाणे | ७७४/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७,३८० प्रमाणे |
| ४ | विरार पोलीस ठाणे | ३८/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ५ | विरार पोलीस ठाणे | २७४/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ६ | तुळींज पोलीस ठाणे | ६८०/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७,३८०, ४२७ प्रमाणे |
| ७ | रबाळे पोलीस ठाणे (नवी मुंबई) | २४५/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ८ | डोंबिवली पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ३९४/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ९ | कळवा पोलीस ठाणे (ठाणे शहर) | १८/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| १० | कळवा पोलीस ठाणे (ठाणे शहर) | १५६/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |

अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असून त्याचेविरुध्द म.को.का., खून, दरोडा, घरफोडी चोरी विशेषतः ज्वेलर्स दुकान चोरी, चारचाकी मोटर वाहन चोरीसारखे १० पेक्षा जास्त गुन्हे गुजरात, नवी मुंबई, ठाणे शहर, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयांर्गत विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

तसेच दिनांक ०८/०५/२०२३ रोजी १७.०० वा.सुमारास फिर्यादी नामे श्री लक्ष्मण धिरु चौहान यांची एम एच ४८ जे २२८१ गुडस कॅरीयर टाटा मोटर्स कंपनीचा ५,००,०००/- रुपये किंमतीचा ट्रक ओम साई पार्कींग श्रीरामनगर नालासोपारा पुर्व ता वसई जि पालघर येथे पार्क करुन ठेवला असता,कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीने चोरी करुन चोरुन नेला म्हणून पेल्हार पोलस ठाणे गुन्हा रजि नंबर ४५९/२०२३ भा.द.वि.३७९ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

त्याअनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष ३, विरार करीत असतांना गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) फहीम अब्बास भुरे रा. गाव महापोली, ता. भिवंडी, जि. ठाणे, २) दिनेश अनांता भोईर, रा. घर नंबर ८१ चिचवली गाव, पो.स्ट. वडपे, ता. भिवंडी यांनी आपसात संगणमत करुन सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १३/०५/२०२३ रोजी गुन्हयातील चोरीस गेलेला ट्रक व गुन्हयात वापरण्यात आलेली मोटारसायकल असा ०५,५०,०००/- रूपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असुन खालील गुन्हे उघडकीस आले आहे.

## -:उघकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | ४५९/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| २ | निजामपुरा पोलीस ठाणे (ठाणे शहर) | २९/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |

वर नमुद आरोपीत यांना पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरार युनिटचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, मनोज सकपाळ, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी उकृष्टरित्या केली आहे.




--------------ooooo--------------